दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●मुख्य संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

● बीड/महाराष्ट्र ● शनिवार दि.२६ ऑक्टोबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -६९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# महाराष्ट्रात कोण होणार मुख्यमंत्री ?

राज्यात कोण होणार मुख्यमंत्री आणि कुणाची सत्ता येणार हे सद्यस्थितीत राजकीय खिचडी असल्याने आज तरी सांगता येणार नाही पण दुसरीकडे काही सर्व्हे येत आहे त्यामुळे आपण कुणाची राज्यात हवा आहे हे सांगू शकतो.

या सगळ्यात महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार, याबाबत अनेक तर्कवितर्क काढले जात आहेत.

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीसंदर्भात लोकनिती सीएसडीएसने सर्व्हे केला आहे. त्यातून काही अंदाज बांधण्यात आले आहेत.

राज्यात सध्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु असून प्रत्येक पक्ष विजय पदरात पाडण्यासाठी कसोशीने तयारी करत आहे. अशातच झालेल्या हरियाणा आणि जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीचे निकाल आले. त्यात हरियानात काँग्रेसला विजय मिळेल असे वाटत असतानाच भाजपच्या हाती सत्तेची चावी आली. त्यामुळे महाविकास आघाडी हळूच आणि सावधगिरीने पावले उचलत आहेत. तर दुसरीकडे कोणताही पक्ष धोका होणार नाही याची खबरदारी घेत आहे. राज्यात खरी शिवसेना आणि खरी राष्ट्रवादी काँग्रेस कोणती हे जनता या निवडणुकीत ठरवणार आहे. यामुळे फुटलेल्या दोन पक्षांचे चार पक्ष झाले. आता या सर्वांच्या भविष्याची ही लढाई आहे. त्यामुळे सर्वच पक्ष जोरदार तयारी करत आहेत. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण होणार, जर महाविकास आघाडीची सत्ता आली तर मुख्यमंत्री कोण आणि महायुतीची सत्ता आली तर मुख्यमंत्री कोण हे अजूनही गुलदस्त्यात आहे. याबाबत अनेक तर्क वितर्क काढले जात आहेत. याबाबत लोकनीती-सीएसडीएसने याबाबत सर्वेक्षण केले आहे. या सर्वेक्षणात लोकप्रिय मुख्यमंत्री उमेदवारांवर लोकांना प्रश्न विचारण्यात आले. सर्वेक्षणात लोकांची उत्तरे प्राप्त झाली आहेत.

**काय सांगतो सर्व्हे**

*सीएसडीएसच्या सर्वेक्षणात, उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, शरद पवार आणि अजित पवार हे मुख्यमंत्रीपदाचे लोकप्रिय दावेदार म्हणून लोकांना त्यांचे मत विचारण्यात आले.

*उद्धव ठाकरे हे सर्वेक्षणात अव्वल असून त्यांना २८ टक्के लोकांनी मुख्यमंत्रीपदासाठी लोकप्रिय उमेदवार मानले आहे.

*न्यूज तकच्या अहवालानुसार, २० टक्के लोकांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांच्या नावाला पसंती दिली आहे.

*देवेंद्र फडणवीस यांना १६ टक्के लोकांनी पसंती दिली आहे.

*८ टक्के लोकांनी राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांना मान्यता दिली आहे.

*३ टक्के लोकांनी अजित पवार यांना मुख्यमंत्रीपदासाठी पसंती दिली आहे.

*महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांची लोकप्रियता एकत्र केली, तरी महाविकास आघाडीपेक्षा महायुतीला मिळालेल्या पसंतीपेक्षा जास्त आहे.




## भारतीय जनता पार्टीच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांची वर्णी लागण्याची चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या काळापासून एकनिष्ठ एक तत्व असलेले भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष माजी नगरपरिषद सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील हे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या काळापासून भारतीय जनता पार्टीचे काम एकनिष्ठपणे पार पाडत आहेत राज्यात देवेंद्र फडणवीस साहेब आणि देशात नरेंद्र मोदी साहेब तसेच बीड जिल्ह्यात पंकजाताई मुंडे डॉक्टर प्रीतम ताई मुंडे यांच्या समवेत भारतीय जनता पार्टीमध्ये एकनिष्ठपणे काम करणारे नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांची बीड जिल्हा भाजपाच्या अध्यक्षपदी वर्णी लागणार असल्याची सध्या बीड जिल्ह्यातील तमाम नागरिकांमध्ये चर्चा होत आहे तसेच त्यांच्या मागील अप्रतिम आणि उत्कृष्ट समाजसेवेच्या कार्याचे मोल लक्षात घेता भारतीय जनता पार्टीच्या सर्वे सर्वा नेत्यांनी तसेच पंकजाताई डॉक्टर प्रीतम ताई यांनी विचार करून नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या सारख्या ढाण्या वाघाला जर भारतीय जनता पार्टीच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी जर विराजमान केले तर भविष्यात नक्कीच भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्ह्यामध्ये गल्ली गल्ली मध्ये खेड्यापाड्यांमध्ये गावागावांमध्ये एक निष्ठेचे जाळे नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या माध्यमातून ते त्यांच्या संपर्कातल्या असलेल्या सर्व नागरिकांच्या माध्यमातून विणल्याशिवाय राहणार नाहीत असे देखील चर्चा सध्या बीड जिल्ह्यामधील नागरिकांमध्ये होतानी आणि दिसत आहे अतिशय संघर्षमय अन्नाचे कार्य असून त्यांना अनेक पक्षातील नेते मंडळींनी वेगवेगळ्या पक्षांमध्ये येण्यासाठी देखील आमंत्रण दिले होते पण त्या आमंत्रणाला न बळी पडता स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या विश्वासाला तडा न जाऊ देणारे नेते म्हणजे नवनाथ



अण्णा शिराळे पाटील हे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या नंतर त्यांच्या कन्या भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव तथा विधान परिषदेच्या विद्यमान आमदार श्रीमती पंकजाताई मुंडे तसेच श्रीमती डॉक्टर प्रीतम ताई मुंडे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली नवनाथ अण्णा शिराळे सध्या भारतीय जनता पार्टीचे उत्कृष्ट कार्य बीड जिल्हा उपाध्यक्ष म्हणून करत सध्या ते बीड जिल्ह्यामध्ये कार्य करत आहेत

**राज्यात देवेंद्र फडणवीस आणि देशात नरेंद्र भाई मोदी तर बीड जिल्ह्यात पंकजाताई मुंडे डॉक्टर प्रीतम ताई मुंडे यांच्या समवेत एक निष्ठेने भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणून सध्या कार्य करणारे नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांचे नाव सध्या बीड जिल्हा अध्यक्ष भारतीय जनता पार्टीचे म्हणून घोषित होण्याची शक्यता असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे .**

सध्या रिक्त असलेले भारतीय जनता पार्टीचे जिल्हा अध्यक्ष पद हे नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या कडे सोपवण्यात यावे असे देखील तमाम बीड जिल्ह्यातील नागरिकांची इच्छा आहे या वर आता पक्षश्रेष्ठींनी निर्णय घेणे आवश्यक आहे असे बोलले जात आहे.

## महाविकास आघाडीला दंडित करण्यासाठी मतदान करा-मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अँड आशिष शेलार

**मुंबई । प्रतिनिधी**

कोरोना काळात ज्यांनी मृताच्या टाळूवरचे लोणी खाल्ले अशा भ्रष्टाचाऱ्यांना दंडित करण्याची संधी आहे, मतदाराने ही संधी गमावून चालणार नाही. म्हणून महाविकास आघाडी नामक भ्रष्टाचाऱ्यांना दंडित करण्यासाठी या विधानसभा निवडणुकीत मतदान करा, असे आवाहन मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अँड आशिष शेलार यांनी आज येथे केले. दहिसर विधानसभेच्या उमेदवार मनिषा चौधरी यांच्या प्रचारार्थ आज दहिसर येथे महायुतीचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अँड आशिष शेलार, जिल्हा अध्यक्ष गणेश खणकर यांच्यासह भाजपाचे, शिवसेना, राष्ट्रवादी, रिपाइंचे प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी आमदार अँड आशिष शेलार म्हणाले की, या निवडणुकीत कोरो काळ आठवा, कारण त्या काळातील अनेक गोष्टींचा हिशेब चुकता करण्याची संधी आता मतदाराला आहे. जेव्हा लोक अँब्युलन्स, खाटा, औषधे आणि उपचारासाठी तडफडत होते तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील सरकारचे बगलबच्चांची कंत्राटे मिळवण्यासाठी स्पर्धा लागली होती. औषधे, कोविड सेंटर पासून मृतांच्या कफना पर्यंत प्रत्येक गोष्टीत कटकमिशन खाण्याचे धंदे करणारे आपण पाहिले आहे. त्यांना आता दंडित करण्याची संधी आहे. मृतांच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्या महाविकास आघाडीला हरवण्यासाठी मतदान करा, असे आवाहन आमदार अँड आशिष शेलार यांनी केले. दरम्यान, त्यापुर्वी त्यांनी मालाड येथे जाऊन भाजपा पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. तसेच ९ व्या टर्मच्या विजयाचा विक्रम करण्यासाठी सज्ज असलेले आमदार कालिदास कोळंबकर आणि मुलुंडचे आमदार मिहीर कोटेचा हे आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या दोघांची सकाळी त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अँड आशिष शेलार यांनी शुभेच्छा दिल्या.

### माझ्यासमोर कोणीही उमेदवार तगडा नसून

## मी मागच्या पंचवार्षिक पेक्षा डबल लीडने निवडून येणार-आ.बंब

**गंगापूर । प्रा संजय तुपे**

माझ्यासमोर कोणीही उमेदवार तगडा नसून मी मागच्या पंचवार्षिक पेक्षा डबल लीडने निवडून येणार असल्याची ग्वाही भाजपचे आमदार प्रशांत बंब यांनी दिली. गंगापूर - खुलताबाद १११ मतदारसंघाचे विद्यामान आमदार प्रशांत बंब यांनी आज गंगापूर तहसील कार्यालयातील नवीन इमारतीत आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी डॉक्टर सुचिता शिंदे यांच्याकडे दाखल केला आहे.

पुढे बोलताना आमदार प्रशांत बंब म्हणाले की मला दोन्ही तालुक्यातील मतदार विकासाच्या बळावर निवडून देतील मी सर्व समाजासाठी कामे केले असून त्यामुळे मागील टर्मच्या दुपटीने लीड घेऊन निवडून येणार असल्याचे मत आमदार बंब यांनी यावेळी व्यक्त केले दिनांक २४ ऑक्टोबर रोजी दुपारी आमदार प्रशांत बंब यांनी त्यांच्या समर्थकांसह गंगापूर येथे नवीन तहसील कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी



भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य किशोर धनायत, रामेश्वर मुंदडा, आमदार प्रशांत बंब यांचे वडील बन्सीलाल बंब, गंगापूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती भाऊसाहेब पदार शेषराव जाधव, अमोल जाधव, रवि चव्हाण, रज्जाक पठाण, कृष्णकांत व्यवहारे, अतुल रासकर, गणेश व्यवहारे, दिपक बढे, दिलीप राजपूत, अनील घुगे, सचिन काकडे, गोपाळ वर्मा, आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## बीजप्रक्रिया करूनच शेतकऱ्यांनी रब्बी पिकांची पेरणी करावी

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई प्रतिनिधी तालुका कृषी अधिकारी बाळराजे मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई तालुक्यातील मोहीम स्वरूपात रब्बी पेरणी पूर्व कामाबाबत जनजागृती करण्यात येत आहे मौजे राडी व परिसरात कृषी विभागच्या वतीने रब्बी ज्वारी पीक प्रात्यक्षिक किट वाटप करण्यात आल्या व हरभरा राजमा ज्वारी करडई ई प्रमुख पिकांची पेरणी क्षेत्र मोठ्या प्रमाणात येणार असल्याने गावागावात बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक कार्यक्रम घेण्यात येत आला. यावेळी किशोर अडगळे यांनी राडी येथे बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखवले व त्याचे महत्व यावर मार्गदर्शन केले. परतीचा पाऊस सतत पडत सुरू असल्याने यावर्षी जमिनीत उशिरा पर्यंत बुरशी राहणार आहे परिणामी रब्बी पिकावर याचा परिणाम दिसून येण्या प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले रब्बी पिकाची पेरणी करण्याआधी कीटकनाशक व बुरशीनाशक



यांची बीजप्रक्रिया करुनच पेरणी करावी तसेच बी बी एफ तंत्रज्ञानाचा वापर करून, बेड वर टोकन करून हरभरा व राजमा पिकाचे शेतकऱ्यांनी पेरणी करावे व आपले आर्थिक फायदा करून घ्यावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी यांच्या वतीने करण्यात येत आहे. यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## माणुसकी जपणे हेच खरे धर्माचरण-ह.भ.प.शिवाजी महाराज मोरे

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

धर्मग्रंथ वाचून ,त्याचे पारायण करून किंवा कर्मकांडाचे आचरण करून कोणीही धार्मिक होत नसतो. विचार आणि वर्तनातून माणुसकी व्यक्त होणे आणि सारे भेदाभेद भ्रम अमंगळ हे उमगणे ,हेच धार्मिकतेचे अस्सल प्रमाण असल्याचे प्रतिपादन ह भ प शिवाजी महाराज मोरे यांनी येथे केले. देहू येथील श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे माजी अध्यक्ष आणि विठ्ठल रुक्मिणी मंदिर ट्रस्ट (पंढरपूर ) चे विद्यमान विश्वस्त असलेल्या ह भ प शिवाजी महाराज मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत १९ वा माहेरची साडी

हा उपक्रम स्नेहालय संस्थेत काल संपन्न झाला.

देह व्यापारातील बळी, मानसिक विकारग्रस्त , शहरी आणि ग्रामीण कष्टकरी , परित्यक्ता ,विधवा आणि एकल सुमारे ३५०० महिलांशी यंदा सहृदय भावांनी बहिणीचे नाते जोडले. आपल्या मानलेल्या बहिणींना नवीन साडी, दिवाळीचा फराळ, आनंदाची शिदोरी भावांतर्फे देण्यात आली. अनामिक भावांनी जोडलेल्या या भावनिक नात्याने सर्वच महिला गहिवरल्या. देहू येथील अभंग प्रतिष्ठान आणि चाकण परिसरातील महिंद्रा लॉजिस्टिक कंपनी, तळवडे (जिल्हा पुणे ) येथील ज्ञानगंगा सोशल फाउंडेशन ,अहिल्यानगर येथील स्नेहधारा फाउंडेशन ,रोटरी क्लब अहमदनगर , अनामप्रेम संस्था , कोपरगाव येथील साई कुबेर डेव्हलपर्स आणि स्नेहालय परिवाराने या उपक्रमासाठी साडी ,फराळ इत्यादींचे संकलन केले.

**नाते जोडणे महत्त्वाचे** -यावेळी संत तुकाराम महाराज यांचे वंशज असलेले शिवाजी महाराज मोरे म्हणाले की, कुटुंब आणि गाव सुटलेल्या एकल महिलांसाठी मदत देण्यापेक्षा सुद्धा त्यांच्याशी भावनेचे नाते जोडणे अनमोल असते . माणसाचा जगण्याचा आधार हा प्रेम आणि आपुलकी असतो. माहेरच्या साडी या उपक्रमातील साडीसोबत येणारा नात्यांचा बंध महिलांना जगण्याची नवी उमेद देणारा आहे. स्नेहालय संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती जया जोगदंड यांनी प्रास्ताविकात नमूद केले की, दोन दशकांपूर्वी सामाजिक कार्यकर्ते असलेले निवृत्त शिक्षक धर्मराज शंकर औटी गुरुजी यांनी माहेरची साडी हा उपक्रम सुरू केला. घरोघर जाऊन एकल महिलांची दुःख सांगून त्यांच्याशी नाते जोडण्यासाठी त्यांनी भाऊ शोधले. दीड वर्षांपूर्वी गुरुजींचे निधन झाले. परंतु त्यानंतर अनेक सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन हा वारसा टिकवला.रंजना रणनवरे, जया जोगदंड, शोभा रोठे आदींनी यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात महिलांच्या भावना व्यक्त केल्या. आपल्याला मिळालेली माहेर ची साडी म्हणजे केवळ वस्त्र नसून जगण्याची उमेद आणि नवी आशा असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी ह भ प माणिक महाराज मोरे महिंद्रा लॉजिस्टिक कंपनीचे जनरल मॅनेजर निंबा भांबरे , येथील मानव संसाधन विभाग प्रमुख धीरज सिंग आणि नामदेव टाचतोडे , अभंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष भसे आणि संघटक विकास कंद, जिल्हा शासकीय रुग्णालयातील डॉक्टर विक्रम पानसंबळ आणि एड्स कक्षा चे कार्यक्रम अधिकारी शिवाजी जाधव, रोटरी क्लबचे अध्यक्ष नितीन खाडे ज्ञानगंगा फाउंडेशनचे अध्यक्ष निलेश बाठे,टाटा मोटर्स च्या कर्मचारी पतसंस्थेचे विवेक ठाकुर , गहूंजे ( जिल्हा पुणे ) येथील उद्योजक नितीन बोडके ,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण च्या एड. भक्ती शिरसाठ आणि एड अस्मिता उदावंत , साई कुबेर डेव्हलपर्सचे पंकज लोढा, दादासाहेब गोंदकर , अनिल वाणी, संजय जाधव आधी व्यासपीठावर उपस्थित होते.

# परळीत आ.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचा शुभारंभ

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**
परळी शहरात प्रथमच खास महिलांसाठी मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचा भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते शुभारंभ करण्यात आला. सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे ह्या उपस्थितीत होत्या. आहार व व्यायामाच्या माध्यमातून आयुष्याला सुंदर बनवा भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी प्रतिपादन केले.मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचाच्या माध्यमातून परळी व परिसरातील महिलांसाठी चांगली सुविधा उपलब्ध झाल्याने परळीकरांचे आरोग्य सुधारत असल्याचे सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी सांगितले.
परळी वैजनाथ शहरातील डॉ. देशपांडे यांच्या दवाखान्या मागे कन्या शाळा रोड परिसरात महिलांसाठी प्रथमच मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचा शुभारंभ भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते पार पडले. भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांनी सेंटरला शुभेच्छा दिल्या. कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या पत्नी सौ. राजश्री धनंजय मुंडे ह्या उपस्थितीत होत्या. याप्रसंगी बोलताना आ.पंकजाताई व सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी सर्व महिलांना मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, आजच्या धावत्या व धकाधकीच्या जीवनात महिलांनी फक्त चूल आणि मूल याच्या पलीकडे जाऊन आपले शरीर निरोगी व आरोग्यदायी कसे राहील याचे मार्गदर्शन करताना मधुराज डान्स स्टुडिओ ला जॉईन होऊन आपले शरीर निरोगी व आरोग्यदायी ठेवावे असे आवाहन केले. याप्रसंगी आ.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, राजश्रीताई धनंजय मुंडे, मनीषाताई अजय मुंडे, प्राजक्ता ताई श्रीकृष्ण कराड, अक्षता ताई सुशील दादा कराड, संध्याताई



प्रतापराव धर्माधिकारी, प्रीतीताई बालाजी मिसर या प्रमुख मान्यवरांची उपस्थितीत होत्या. तसेच शहरातील विविध व्यवसायातील व घरगुती अनेक महिला उपस्थित होत्या.
यावेळी मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओच्या संचालिका सौ.मधुरा विशाल पाठक यांनी सर्वमान्यवराचे स्वागत करून मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओ सुरू करण्यामागची भूमिका विषद केली.आहारातून आरोग्याकडे प्रत्येकाला नेण्यासाठी फिटनेस सेंटर सुरू करण्यात आले.मधुराज फिटनेस अँन्ड डान्स स्टुडिओचा महिलांनी सेंटरचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. यावेळी वासुदेव अनंतराव पाठक ( मा. नगरसेवक ) सुवर्णा वासुदेवराव पाठक, दत्तात्रय विठ्ठलराव कुलकर्णी, भारतीताई दत्तात्रय कुलकर्णी मा. नगरसेविका उपस्थितीत होते.परळी शहरात महिलांसाठी प्रथमच नव्याने सुरू झालेल्या मधुराज फिटनेस ॲण्ड डान्स स्टुडिओत महिलांसाठी एरोबिक्स, स्टेप एरोबिक्स, झुम्बा, कार्डिओ, मेडिटेशन, योगा इतर वर्कआऊटस् डमबेल्स वर्कआऊट, स्टीक वर्कआऊट, लेझिम वर्कआऊट, बॉलीवुड डान्स, ३ ते १२ वयोगटातील मुला-मुलिंसाठी क्लासिकल डान्स, फोल्क डान्स, बॉलीवुड डान्स, फ्री स्टाईल डान्स झुम्बा, एरोबिक्स, मेडीटेशन, योगा आदी सुविधा असणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ मधुरा पाठक तर दीपा अमित भताने यांनी आभार मानले.

## बीडच्या मैदानात पँथर उतरला

# जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांचा अर्ज दाखल

**बीड | प्रतिनिधी**
बीडचे राजकीय मैदान गाजवण्यासाठी नितीन सोनवणे रुपी आक्रमक पँथर उतरला आहे ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांचा आज बीड विधानसभेसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला जनसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी २४ तास उपलब्ध राहणारा युवा नेता म्हणून नितीन सोनवणे यांची जिल्ह्याला ओळख आहे समाजातील सर्व जाती धर्मामध्ये सोनवणे यांचा मोठा मित्र परिवार आहे सोनवणे यांच्या उमेदवारीने बीड विधानसभा क्षेत्रातील जनतेसमोर एक चांगला उमेदवार निवडून योग्य पर्याय निर्माण झाला आहे नितीन सोनवणे यांनी शुक्रवार दिनांक



२५ रोजी बीड विधानसभा निवडणुकीसाठी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज सर्व महापुरुषांना अभिवादन करून दाखल केला या प्रसंगी कावेरी जाधव, सूर्यकांत ठोकळ, दीक्षा मीर पगार, कोमल तुरुकमारे, पापाभाई, निसार शेख, सुंदर वाघमारे,रोशन धिवार,प्रशांत पायाळ, सय्यद आतार, उमेश पारिक आकाश शिंदे, व शेकडो कार्यकर्ते पदाधिकारी व समाज बांधवांना च्या उपस्थितीमध्ये अर्ज दाखल केला.

# अटर का पटर' कवितासंग्रहास संत नामदेव राष्ट्रीय बालसाहित्य पुरस्कार

**शिरूर कासार | प्रतिनिधी**
प्रसिद्ध बालसाहित्यिमक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'अटर का पटर' या बालकविता संग्रहास हिंगोली येथील समृद्धी प्रकाशनच्या वतीने दिला जाणारा संत नामदेव राष्ट्रीय बालसाहित्य पुरस्कार ता.२४ रोजी जाहीर झाला आहे.
बाल वाचक केंद्रस्थानी ठेवून 'अटर का पटर' या बालकविता संग्रहाची निर्मिती झाली असून संस्कारक्षम, देशभक्तीपर, बालसुलभ कवितांचा त्यात समावेश आहे. डॉ. विठ्ठल जाधव यांनी पांढरा कावळा, गर्भकळा, तिवढा, मानवता व्हाउचर, बटाटीची धार, उंदरीन सुंदरीन अशा अनेक पुस्तकांचे विविध वाङ्मय प्रकारांतून चौफेर लेखन केले आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि वाचन चळवळीत महत्वाचे योगदान त्यांनी दिले






आहे. बालसाहित्यात संशोधन केले आहे. महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय साने गुरुजी उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार 'पांढरा कावळा' या कादंबरीस प्राप्त आहे.
समृध्दी प्रकाशन हिंगोली यांच्या वतीने विविध राष्ट्रीय पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र देऊन मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात येईल असे प्रा. डॉ. श्रीराम कऱ्हाळे यांनी कळविले आहे.

# शांताबाई रंजवे यांचे दुःखद निधन

**पाटोदा | प्रतिनिधी**
पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील रहिवाशी शांताबाई नाथा रंजवे यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी वयोवृद्धपणाने व अल्पशा आजाराने दि.२४/१०/२०२४ गुरुवार रोजी रात्री राहत्या घरी दुःखद निधन झाल्याने पिंपळवंडी व पिंपळवंडी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.त्यांना मागील आठवड्यात हृदयविकाराचा झटका आला होता.त्या धार्मिक वृत्तीच्या तसेच शांत,संयमी, मनमिळावू स्वभावाच्या होत्या.त्या वारकरी संप्रदायाच्या भाविक-भक्त होत्या.त्यांचा भजनाच्या कार्यक्रमात सतत सहभाग असायचा.त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता सोमेश्वर मंदिराजवळील स्मशानभूमीत शोकाकुल



वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी सामाजिक,राजकीय व सर्व स्तरातील तसेच ग्रामस्थ,नातेवाईक उपस्थित होते.त्यांच्या पश्चात विवाहित दोन मुले,तीन मुली,सुना,जावई,नात, नातवंड,पत्रंड असा परिवार आहे. त्यांच्या दुःखात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

# देवेंद्र फडणवीस यांचा उमेदवारी अर्ज दाखल:पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आणण्याचा विश्वास

**नागपूर (वृत्तसंस्था)**-२०१९ प्रमाणेच नागपुरातील दक्षिण-पश्चिम मतदारसंघातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजारो समर्थकांच्या उपस्थितीत शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, शिंदेसेनेचे नेते आमदार कृपाल तुमाने, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत पवार उपस्थित होते. संविधान चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सर्व नेते मिरवणुकीने तहसील कार्यालयात पोहोचले आणि फडणवीसांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. २०१९ मध्येही फडणवीसांनी शुक्रवारीच अर्ज दाखल केला होता. त्यावेळी चंद्रकांत पाटील प्रदेशाध्यक्ष होते. या नंतर पूर्वमधून कृष्णा खोपडे, दक्षिणमधून मोहन मते यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केले.गेल्या पाच वर्षांत महायुतीच्या सरकारने राज्यात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली. त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मागील पंचवीस वर्षे विधान मंडळाचा सदस्य म्हणून माझे काम जनतेने पाहिले आहे. त्यामुळे जनतेचा आशीर्वाद मला मिळेल असे ते म्हणाले. माझ्यासोबत महायुती सरकारलाही पुन्हा एकदा जनतेचा आशीर्वाद मिळेल असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.नाना पटोले कट्टर राहुल गांधी भक्त आहे. त्यामुळे राहुल गांधी यांच्या आरक्षण विरोधी भूमिकेचे समर्थन करतात. कारण त्यांचे भवितव्य त्यावर अवलंबून आहे, असा टोला फडणवीसांनी हाणला.

# प्रा. टी.पी.मुंडे समर्थकांची रविवारी बैठकीचे आयोजन

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**
विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. परळी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदारसंघातील प्रमुख कार्यकर्त्यांसोबत चर्चा करण्यासाठी महाराष्ट्राचे ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सरांच्या नेतृत्वाखाली रविवार दिनांक २७ ऑक्टोबर सकाळी ११:३० वाजता औद्योगिक वसाहत सभागृह नाथ रोड परळी वैजनाथ येथे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्या अनुषंगाने त्यांनी आपल्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बोलावली असून या बैठकीत निवडणुकीच्या अनुषंगाने विचार विनिमय करण्यात येणार आहे याच बैठकीत कार्यकर्त्यांना ते मार्गदर्शन करणार असून आगामी विधानसभा निवडणुकीची भूमिका स्पष्ट करणार आहेत असे आवाहन ओबीसी बहुजन आघाडीचे चिटणीस रफिक कुरेशी, मराठवाडा अध्यक्ष भीमराव मुंडे, बीड जिल्हाध्यक्ष विनायक गडदे, परळी तालुकाध्यक्ष सूर्यकांत मुंडे, अनिल मस्के, प्रा.विजय मुंडे, छत्रपती कावळे, जि. प .सदस्य प्रदीप भैय्या मुंडे उर्फ बबलू शेठ, गोपाळ तांदळे, जम्मू शेठ, रघुनाथ डोळस,श्याम गडेकर, नवनाथ क्षीरसागर,बबलू सय्यद, राहुल कांदे ,नागेश व्हावळे,किशोर जाधव आदींनी केले आहे



# पुणे येथे इंडियन मेडिकल असोसिएशनचा 'कलादर्पण २०२४' राज्यस्तरीय सांस्कृतिक सोहळा उत्साहात साजरा

## सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांची माहिती

**अंबाजोगाई | परवेज पटेल**
इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्याच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध राज्यस्तरीय स्पर्धांचे पारितोषिक वितरण व गुणदर्शन कार्यक्रम नुकताच पुणे येथे संपन्न झाल्याची माहिती सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष तथा अंबाजोगाई येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी दिली.
या कार्यक्रमास संघटनेचे प्रदेश अध्यक्ष डॉ.दिनेश ठाकरे,नियोजित अध्यक्ष डॉ. संतोष कदम ,सचिव डॉ. सौरभ संजनवाला, कोषाध्यक्ष डॉ.विक्रांत देसाई, इंडियन मेडिकल असोसिएशनचे पुणे शाखेचे अध्यक्ष डॉ.रंजन संचेती, डॉ.राजेश इंगोले अध्यक्ष, सांस्कृतिक समिती महाराष्ट्र राज्य, डॉ. संजय पाटील, डॉ.नवरंगे, सचिव डॉ.वीरेंद्र ओस्टवाल, उपाध्यक्ष डॉ.वैजयंती पटवर्धन, सहसचिव डॉ.मीनाक्षी कुलकर्णी, डॉ.संतोष कुलकर्णी, डॉ.गीतांजली शर्मा, डॉ.तुकाराम मुंढे, डॉ.मोहिनी गानू, डॉ.वृंदा कुलकर्णी, डॉ.राजेश्री सावंत, डॉ.पल्लवी दोडके, डॉ. प्रज्ञा किनगावकर , डॉ. राजन जोशी, डॉ.माया भालेराव यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सौरभ संजनवाला, डॉ.राजेश इंगोले, डॉ.संतोष कदम, डॉ.संजय पाटील, डॉ.वैजयंती पटवर्धन, डॉ. मीनाक्षी कुलकर्णी, डॉ.संतोष कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्तविक करताना आयएमएचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले म्हणाले की, कला ही माणसाच्या जगण्यात उतरली पाहिजे आणि जीवनातील ताणतणाव कमी करण्यासाठी प्रत्येकाने एखादी कला जोपासली पाहिजे असे मत व्यक्त केले. तसेच आय एम ए महाराष्ट्र तर्फे सलग दुसऱ्या वर्षी कलादर्पण २०२५ हा कलाउत्सव महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्स साठी आयोजित केला आणि व्यस्त असणाऱ्या डॉक्टर्सनी या महोत्सवात प्रचंड संख्येने सहभागी होऊन याचा आनंद घेतला. महाराष्ट्रातील डॉक्टर्ससाठी या सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. आपल्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनात ताणतणाव विसरून इतक्या प्रचंड संख्येने डॉक्टर्स सहभागी झाले हेच या आयोजित कार्यक्रमाचे फलीत आणि यश असल्याचे सांगितले. संघटनेचे राज्याचे सचिव डॉ.सौरभ संजनवाला यांनी इंडीयन मेडीकल असोसिएशन सांस्कृतिक समिती तर्फे आयोजित या गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, छायाचित्र स्पर्धा, नृत्यस्पर्धा,रिल्स स्पर्धा , काव्य लेखन स्पर्धा



इतक्या मोठ्या प्रमाणात यशस्वी केल्याबद्दल सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांचे अभिनंदन करीत पुढील काळात सुद्धा अशा बहारदार कार्यक्रमांचे आयोजन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावर्षी घेण्यात आलेल्या या स्पर्धा न भूतो न भविष्यती अशा प्रकारे आयोजित करण्यात आल्या आहेत असे गौरवोद्गार काढत आयएमए ही संघटना खऱ्या अर्थाने डॉक्टर्सच्या सुखदुःखात सदैव सहभागी असते असे प्रतिपादन केले. पुणे स्थानिक शाखेचे अध्यक्ष डॉ. राजन संचेती यांनी डॉ. राजेश इंगोले हे उत्साहाचं अजब रसायन आहे जे कार्य हाती घेतात ते केवळ तडीस नेतात अस नाही तर पूर्ण ताकतीने स्वतःला त्यात झोकून देऊन त्या कार्याला नवीन आयाम देतात. कलादर्पण २०२४ वर्ष दुसरे पुणे येथे आयोजित करण्याचे सौभाग्य पुणे शाखेला मिळाले आहे. त्याबद्दल संघटनेचे आभार मानले. डॉ. संतोष कदम यांनी डॉक्टर्स हे धरती वरील देव मानले जातात पण, वस्तुस्थितीत डॉक्टर्स ही सर्वसामान्य व्यक्ती असते. दैनंदिन ताणतणाव, प्रश्न, समस्या त्यालाही असतात त्यामुळे त्यांनाही या ताणतणावापासून मुक्ती हवी असते आणि या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनातून आणि समोर उपस्थित डॉक्टर्सची संख्या पाहता डॉ.राजेश इंगोले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा हेतू साध्य केल्याचे दिसून येते. उपस्थित डॉक्टर्स आपआपल्या विषयांत तर तज्ज्ञ आहेतच पण, त्यांनी यावेळी ज्या कला सादर केल्या आहेत, त्यामुळे आम्हीही अचंबित झालो असल्याची प्रांजळ कबुली देत डॉक्टर्स ही उत्तम गायक, संगीतकार, फोटोग्राफर, चित्रकार, उत्कृष्ट नर्तक, कवी कवयित्री , रिल्स स्टार असू शकतात हे या कलादर्पण २०२४ सांस्कृतिक सोहळ्याने दाखवून दिल्याचे मत व्यक्त केले.
यावेळी इंडीयन मेडीकल असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.गीतांजली शर्मा तर आभार प्रदर्शन डॉ.राजन जोशी यांनी केले.
कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतीक समितीच्या सर्व मध्यवर्ती कार्यकारणीने व पुणे स्थानिक शाखेच्या पदाधिकार्यांनी परिश्रम घेतले

# आचारसंहितेचे उल्लंघन होतेय ? मग,सी व्हिजिल पवर तक्रार करा

## १०० मिनिटाच्या आत मिळतो प्रतिसाद

**जालना । असलम कुरेशी**

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची तारीख जाहीर केली आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून राज्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार, नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी व्हिजिल सिटीझन प विकसित केले आहे. या पवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे.

आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करु नये याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. पण, काहीवेळा आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी व्हिजिल प विकसित केले आहे. या मोबाईल पद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सी व्हिजिल पवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.

सी व्हिजिल प अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त प उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशिल, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हीडिओ प्रदान करणे आवश्यक आहे. प वापरकर्त्यांना त्यांच्या तक्रारींच्या प्रगतीचा मागोवा घेता येणार आहे.

वैशिष्ट्ये

सी व्हिजिल प हा वापरकर्त्यांना आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाची तक्रार करण्याची अनुमती देतो. नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतो. उल्लंघनाचे स्थान ट्रॅक करण्यासाठी जीपीएस वापरतो. वापरकर्त्यांना केवळ थेट घटना चित्रित करण्याची अनुमती देतो. तक्रारीच्या प्रगतीचा मागोवा घेतो.

वापर कसा करायचा




एन्ड्रॉईड मोबाईलमधील गुगल प्ले स्टोर आणि आयफोनमधील प स्टोर या पमध्ये जावून सी व्हिजिल (लतखत्रखड) सर्च करावे.त्यानंतर प डाऊनलोड करा. त्यानंतर प उघडून मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदारसंघ समाविष्ट करुन खाते तयार करा. तुम्हाला ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हीडिओंसह घटनेचे तपशील टाका. त्यानंतर तक्रार सबमिट करा.

अचूक कृती व देखरेख

या प्लिकेशनचा वापर करून, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात न जाताही काही मिनिटांतच नागरिक राजकीय गैरव्यवहाराच्या घटनांची तक्रार नोंदवू शकतात. हा सी व्हिजिल प जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडतो. ज्यामुळे एक जलद आणि अचूक कृती, देखरेख आणि अहवाल प्रणाली तयार होते.

लाईव्ह फोटो, व्हिडिओ

या पच्या अचूकतेसाठी पमधून फक्त लाईव्ह लोकेशनवर आधारित फोटो, व्हीडिओ घेतले जातात. जेणेकरुन भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमुंना वेळेत कार्यवाही करणे शक्य होईल.

तातडीने होते कारवाई

या पवर तक्रार दाखल होताच स्थानिक निवडणूक यंत्रणा तुमच्या तक्रारीची चौकशी करेल आणि योग्य ती कारवाई करेल.

डाटा सुरक्षा

या पवरील डाटा हा सुरक्षित ठेवला जातो. हा डाटा इतर कोणत्याही थर्ड पार्टीला दिला जात नाही. याशिवाय हा डाटा एन्ड टू एन्ड इन्क्रिप्टेड ठेवला जातो.

# मुखेड बाराळी मार्गावर अपघातात जखमींना मदतीचा हात

**नांदेड । हनुमंत चंदनकर**

नांदेडच्या नायगांव शहरातील सर्व परिचित असलेले चव्हाण परिवार गेल्या अनेक दशकापासून जिल्ह्यातील अनेकाच्या सुखदुःखात अडीअडचणीत व अनाथाच्या मदतीला ते धावून जात असतात कै बळवंतराव पाटील चव्हाण यांच्यापासून ते रवींद्र पाटील चव्हाण यांनी सदैव जनतेच्या सेवेत असतात मुखेड बाराळी मार्गावर भावी खासदार रवींद्र पाटील चव्हाण यांच्या प्रचारार्थ जात असताना मार्गावर एका अज्ञात व्यक्तीचा अपघात झाला होता व ती अपघातातील व्यक्ती मदतीसाठी तळमळ करत असताना त्याच मार्गावरून अनेक वाहने ये जा करत होती अनेक व्यक्ती दुरून पाहत होती परंतु प्रत्यक्ष त्यांच्या मदतीला कोणीही जात नव्हते नायगाव येथील चव्हाण परिवारातील नगरसेवक



पंकज पाटील त्या अपघातातील अज्ञात व्यक्तींना पाहिलं व कुठलाही विचार न करता त्या जखमी अवस्थेत असलेल्या व्यक्तींना आपल्या गाडीत घेऊन तातडीने त्यांना दवाखाना गाठला व त्यांच्यावर उपचार सुरू केले त्या व्यक्तीचा प्राण वाचला त्यांनी अनेक दिन दुबळ्याची सेवा करतात अतिथी देवो भव त्या उक्तीप्रमाणे घरी आलेल्या व्यक्तीला चहापाणी व त्यांचे प्रेमाने स्वागत करतात गोरगरिबाच्या सुखदुःखात सदैव तत्पर असतात गेल्या अनेक दशकापासून यांच्या उत्तम कार्याची दखल घेऊन भरगच्च समास त्यांची पाठीशी आज उभा आहे नुकतच निधन झालेले लोकप्रिय खासदार वसंतराव चव्हाण यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून व त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांचेच पुत्र रवींद्र पाटील चव्हाण धुरा सांभाळत आहेत याचाच अर्थ ते जिल्ह्यातील अनाथाचे नात म्हणून उत्कृष्ट काम करत आहेत हे सर्व दृश्य रस्त्यावरील व्यक्तींनी पाहिल्यानंतर प्रत्येकाच्या डोळ्यातून अश्रू येत होते कारण कुठलीच ओळख पाळख नसताना एखाद्या व्यक्तीचा प्राण वाचवणे हा मानव धर्म त्यांनी पाळला अपघात प्रसंगी स्वर्गीय खासदार वसंतराव बळवंतराव पाटील चव्हाण यांचे पुतणे नगरसेवक पंकज पाटील चव्हाण विजय पाटील बेटमोगरेकर दिनेश आप्पा आवडके सुरज बेळगे भगवान शिंदे राहुल जाधव मनोज बेळगे आधी होते.. हनुमंत चंदनकर एन टीव्ही न्यूज नायगाव नांदेड

# अंबाजोगाई परिसरात पर्यटन व्यवसायाला संधी–ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई परिसरात पर्यटन व्यवसायाला भरपूर संधी असल्याचे मत ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार यांनी व्यक्त केले. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवतराव चव्हाण महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्यावतीने २४ ऑक्टोबर २०२४ रोजी अंबाजोगाई परिसरातील पर्यटनाच्या संधी या विषयावर कार्यशाळेचे उद्घाटन व बीज भाषक म्हणून सुदर्शन रापतवार बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. माणिकराव बावणे तर व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे उपस्थित होते. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ यांची विशेष उपस्थिती होती. आपल्या विस्तारीत भाषणात सुदर्शन रापतवार यांनी अंबाजोगाई शहराला लाभलेल्या ऐतिहासिक,



पौराणिक, नैसर्गिक, धार्मिक पार्श्वभूमीचा सर्वांगिण उल्लेख करीत या गावाची भौगोलिक आणि नैसर्गिक परिस्थिती ही पर्यटन उद्योगाला चालना देणारी असून या परिसरात उपलब्ध असलेल्या या नैसर्गिक परिस्थिताचा उपयोग पर्यटन व व्यवसायाच्या संधी वाढवण्यासाठी करावयाला हवी असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. अनंत मरकाळे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी असे १४५ लोक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विद्यार्थी समी खान यांनी केले.

# ‘शासन यंत्रणाचा ताबा घेणे हे प्रत्येक कामगारांचे ध्येय असले पाहिजे–लहुदास रोडे

## राष्ट्रीय मजदुर कांग्रेस इंटक परळी अध्यक्षपदी लहूदास रोडे, उपाध्यक्षपदी देविदास जंगले

**परळी । प्रतिनिधी**

राष्ट्रीय मजदुर कांग्रेस इंटक चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जी.संजिवा रेड्डी यांच्या व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ.कैलास भाऊ कदम, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बाबासाहेब चव्हाण यांच्या आदेशावरून बीड जिल्हा इंटक कार्यालय येथे २४ आक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११:३० बैठक घेण्यात आली या बैठकीत असंघटित आणि संघटीत क्षेत्रातील कामगारांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी आणि येत्या काळात कामगार चळवळ भक्कम उभी करण्यासाठी राष्ट्रीय मजदुर कांग्रेस (इंटक) च्या परळी तालुका अध्यक्ष पदी प्रा . लहुदास रोडे यांची निवड करण्यात



आली आहे तर उपाध्यक्षपदी देवदास जंगले व सचीव पदी गजेंद्र फड यांना नियुक्ती करण्यात आले आहे , येणाऱ्या काळात कोणत्याही कामगार आपल्या न्याय्य हक्कापासून वंचित राहाणार नाही आणि शासन



यंत्रणा ताब्यात घेणे हे प्रत्येक कामगारांचे ध्येय असले पाहिजे व कामगारांची कल्याणकारी शासन शासन व्यवस्था निर्माण झाली पाहिजे प्रखंड मत यावेळी प्रा . लहुदास रोडे यांनी व्यक्त केले.

# घनसावंगी विधानसभा मतदार संघात ७ उमेदवारांची ११ नामनिर्देशन पत्र दाखल

## ८३ उमेदवारांनी हस्तगत केली १८० नामनिर्देशन पत्र

**जालना । असलम कुरेशी**

घनसावंगी विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढण्यास इच्छुक उमेदवारांचे २२ ऑक्टोबर पासून उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात येत आहे. शुक्रवार पर्यंत ७ उमेदवारांनी ११ नामनिर्देशन पत्र दाखल केली असून आतापर्यंत ८३ उमेदवारांनी १८० नामनिर्देशन पत्र हस्तगत केल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती मनिषा दांडगे व नायब तहसीलदार आशिष पैठणकर यांनी दिली.घनसावंगी विधानसभा मतदार संघात नेमके किती उमेदवार निवडणूक लढविणार हे सध्या सांगता येणार नसले तरी सध्या तरी अनेक इच्छुक उमेदवार निवडणूक रिंगणात उतरणार असल्याची चर्चा आहे. मात्र शेवटपर्यंत किती उमेदवार निवडणूक रिंगणात राहणार हे ४ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी स्पष्ट होणार आहे. त्यामुळे राजकिय वातावरण तापण्याची चिन्हे



आहेत.घनसावंगी विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख २४ हजार ७८३ मतदार असून, त्यात पुरूष १ लाख ६८ हजार ६९७, महिला १ लाख ५५ हजार ९५२ तर सैनिक मतदार १३४ आहेत. यासाठी एकूण ३५४ मतदान केंद्र आहेत. ३५४ व राखीव ३६ असे एकूण ३८९ पथके स्थापन केली असून, यात अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्त करण्यात आली आहे, अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार योगिता खटावकर यांनी दिली.या उमेदवारांनी भरली नामांकन पत्रचोथे शिवाजीराव कुंडलीकराव (२ नामनिर्देशन पत्र), ज्ञानेश्वर प्रतापराव पवार (१ नामनिर्देशन पत्र), राजेश अंकुशराव टोपे (२ नामनिर्देशन पत्र), मनिषाताई राजेशभैय्या टोपे (१ नामनिर्देशन पत्र), रमेश मारोतराव वाघ (१ नामनिर्देशन पत्र), निसार सुभानखां पठाण (२ नामनिर्देशन पत्र), गजानन रामनाथ उगले (२ नामनिर्देशन पत्र)

# अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला

## शहर विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवणार–आ.संग्राम जगताप

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघातून महायुतीच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपाचे समन्वयक महेंद्र भैय्या गंधे, सचिन जाधव, किशोर डागवाले, अविनाश घुले, प्राध्यापक माणिकराव विधाते, संजय चोपडा, रवींद्र बारस्कर, अमोल गाडे, प्रा. अरविंद शिंदे, संजय ढोणे, सतीश शिंदे, अजय चितळे, उदय कराळे, नरेंद्र कुलकर्णी, अभिजीत खोसे, वैभव ढाकणे, ज्ञानेश्वर काळे, अमित गटणे, मनोज ताठे, अजिंक्य बोरकर, सुमित कुलकर्णी आदी उपस्थित होते.

यावेळी महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप म्हणाले की, विधानसभेची निवडणूक ही विकासाच्या कामावर लढवली जात असून सर्वांना बरोबर घेऊन जनतेचे आशीर्वाद घेतले जातील, निवडणूक लढवीत असताना गेल्या दहा वर्षांमध्ये केलेली विकास कामे जनतेपर्यंत घेऊन जाण्याचे काम केले आहे, आपल्या शहरा बद्दल सकारात्मक दृष्टिकोन ठेवून विकासाच्या योजना राबवत आहे. जनतेच्या मतरुपी आशीर्वादामुळे माझा विजय निश्चित असून पुढील ५ वर्षात विकास कामातून शहराचा कायापालट करेल असे ते म्हणाले.



# मुस्लिम बांधवांचा प्रचंड मेळाव्यात माजी आ.भिमराव धोंडे यांना एकमुखी पाठिंबा

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित प्रचंड मेळाव्यात मुस्लिम बांधवांनी माजी आमदार भीमराव धोंडे यांना एकमुखी पाठिंबा दिला. माझ्या राजकीय जिवनात मी प्रथमच मुस्लिम बांधवांचा मेळावा घेतला असून एवढ्या प्रचंड संख्येने बांधव उपस्थित आहेत.आपल्या प्रेमाने मी भारावून गेलो आहे.माझ्या राजकारणात मतदारसंघातील दुसरी पिढी मला साथ देत आहे याचा मला अभिमान वाटतो.मी आतापर्यंत सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन मतदारसंघाचा विकास केला आहे असे प्रतिपादन माजी आ. भीमराव धोंडे यांनी मेळाव्यात बोलताना केले.

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आ.भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी आष्टी येथे मतदारसंघातील अल्पसंख्याक (मुस्लिम) समाज बांधवांच्या संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षण सभापती नियामत बेग होते.

पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की,मिरावली पहाडावर मी माझ्या आईसोबत लहानपणी दर्शनासाठी जात होतो.माझी आई देवी निमगाव येथेही दर्ग्याचे दर्शन घेण्यासाठी जात होती.मी आठ वर्षांपूर्वी देवी निमगाव येथे मोठा दर्गा बांधला आहे. माजी सभापती नियामत बेग यांना मीच उर्दू शाळा सुरू करून दिली आहे तसेच पाटोदा येथे ही उर्दू हायस्कूल सुरू केले आहे.त्याचप्रमाणे माझे मित्र स्व. निजाम पटेल यांचे नाव मेहेकरी येथील शाळेला दिले आहे. लोणी येथेही सय्यदमीर बाबा यांचे शाळेला नाव दिले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र केसरी सईद चाऊस यांनाही वेळोवेळी सहकार्य केल्याने त्यांनी कुस्तीमध्ये नावलौकिक मिळवला.आमच्या संस्थेत आठ टक्के मुस्लिम बांधव कर्मचारी आहेत.मी विकास कामे करताना कोणत्याही कामात कधीच कमिशन घेतले नाही भविष्यातही घेणार नाही. अनेक मुस्लिम बांधव परिस्थितीने आर्थिक दृष्ट्या गरीब आहेत. मुस्लिम समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे त्यांनी आपल्या पाल्यांना चांगले शिक्षण द्यावे व मोठे करावे, शिक्षणाने सर्वांगीण विकास होतो. शिकण्यासाठी शिष्यवृत्ती मिळते याचा लाभ घ्यावा. मतदारसंघातील सर्व जाती धर्माच्या सर्वांगीण विकासासाठी मला आपण साथ द्यावी असे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी शेवटी केले. मेळाव्याच्या निमित्ताने ग्रामपंचायत सदस्य नाशिर पठाण यांनी कार्यकर्त्यांसह माजी आमदार भीमराव यांच्या गटात प्रवेश केला.यावेळी मौलाना अब्दुलभाई यांनी सांगितले की,सर्वसामान्य कुटुंबातील नियामत बेग यांना



जि.प.सदस्य करुन सभापती बनविले,सईद चाऊस यांना वेळोवेळी सर्व प्रकारचे सहकार्य करीत महाराष्ट्र केसरी पर्यंत पाठविले,सादिक कूरेशी यांना पं.स.सदस्य केले,जिल्ह्याला सर्व प्रथम शिक्षण सभापतीपद देण्याचे काम माजी आमदार धोंडे यांनी केले. यावेळी युवा नेते अजयदादा धोंडे,जेष्ठ नेते इकबालभाई पेंटर,उपसभापती पांडुरंग नागरगोजे,रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे,सय्यद शहाबुद्दीन,शाहिद कादरी,डॉ. मुश्ताक शेख व इतरांची भाषणे झाली.कार्यक्रमास युवा नेते अजयदादा धोंडे,
माजी सभापती साहेबराव म्हस्के ,जि.प.सदस्या वर्षा माळी,उपसभापती पांडुरंग नागरगोजे,अभयराजे धोंडे, शंकरराव देशमुख,माजी जि.प. सदस्य रामराव खेडकर,रामदास बडे, अशोक सव्वाशे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, दिलीपराव म्हस्के,माजी सभापती सुवर्णाताई लांबरुंड, माजी सरपंच बाळासाहेब पवार, काकासाहेब लांबरुंड,किशोर खोले,माजी जि.प.सदस्य सतिश झगडे,माजी सरपंच चंद्रशेखर साके,माजी पं.स.सदस्य संजय धायगुडे,बाबुराव कदम,जमीर पठाण, ड.सय्यद अशरफ,आस्तकाभाई शेख,खालिद भाई शेख,नवनाथ सानप,बाजीराव वाल्हेकर, शेरखान पठाण,कलीम पठाण, खुर्शीद सर,फय्युम पठाण, रघुनाथ शिंदे,आदम पठाण,निजाम बेग,जाऊभाई शेख,जमील शेख,चांदभाई कारेगाव वाले,सलीम चाऊस, इस्माईल पठाण,दिलावर पठाण,माजी सभापती अनिल जायभाय,महेबुबभाई,राजपाल शेंडगे,मोहम्मद हसन चाऊस, शेरखान पठाण,रिजवान बिल्डर,कुप्पा शेख,सरपंच दादासाहेब जगताप,सय्यद वाजेद फौजी,सय्यद मतीन,असलम पठाण,मोमीन शेख,अन्सार कुरेशी,हादी शेख, अज्जुभाई शेख,निसार सय्यद, मौलाना गुलाम हापीज,मौलाना अब्दुल हाजी,अख्तरभाई, निसारभाई सौदागर,सय्यद साजिद,इस्माईल तांबोळी, सलमान पठाण,हमीदभाई शेख, मोहसिन कुरेशी,बाबुलाल पठाण,निजामभाई शेख,डॉ. अकिल, मोहंमद करदुस, राजु भाई शेख, गुलाब शेख, अमर शेख,मौलाना हबीब, अय्यास कुरेशी,अल्ताफ सय्यद,देविदास शेंडगे,आदेश निमोणकर यांच्यासह आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ.विनोद ढोबळे व प्रा.खेमगर यांनी केले व उपस्थित त्याचे आभार अज्जुभाई शेख यांनी मानले.

### आ.संजय शिंदे यांच्या विशेष प्रयत्नातून

# स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांनी शेरेवस्ती, देवळाली येथील ग्रामस्थांना मिळाला अधिकृत रस्ता

## मा.सरपंच आशिष आण्णा गायकवाड यांची माहिती

**सोलापूर । प्रतिनिधी**

प्रयत्नाबरोबरच कामाला विश्वासाची जोड असली की यश आपोआप मिळतेच, याचा प्रत्यय शेरेवस्ती, देवळाली येथील रस्त्याच्या कामात दिसून येत आहे. शेरेवस्ती येथे जवळपास ७०० ते ८०० लोकसंख्या असून, या वस्तीला गावातून जाण्यासाठी अधिकृत रस्ता स्वातंत्र्यपूर्व काळापासून नव्हता. परंतु देवळालीचे माजी सरपंच आशिष आण्णा गायकवाड आणि त्यांच्या ग्रामपंचायत टीमच्या प्रयत्नातून वनविभागाच्या विविध अटी, शर्ती पूर्ण करून हा रस्ता पूर्ण करण्याचा मानस हाती घेतला आहे.या रस्त्याचे काम सुरू झाले असून, ८ दिवसांमध्ये सदर रस्ता ग्रामस्थांना जाण्यासाठी हस्तांतरित करण्यात येणार आहे. या रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी ४ वर्षापासून पाठपुरावा चालू होता.
करमाळा- माढा विधानसभा मतदारसंघाचे





आ. संजयमामा शिंदे यांच्या प्रयत्नातून जिल्हा वनाधिकारी श्री धैर्यशील पाटील व त्यांच्या टीमने विशेष सहकार्य केले. ग्रामपंचायत देवळालीच्या वतीने वेळोवेळी वनाधिकारी सोलापूर, वनविभाग मोहोळ, वनविभाग भोर, करमाळा तहसील कार्यालय, प्रांताधिकारी कार्यालय कुर्डुवाडी या ठिकाणी पाठपुरावा केला, त्याचे फलित आज मिळाले. रस्त्याचे काम चालू झाल्यानंतर ग्रामस्थांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.सदर काम पूर्ण करण्यासाठी सरपंच प्रतिनिधी धनंजय शिंदे, माजी सरपंच गहिनीनाथ गणेशकर, उपसरपंच प्रतिनिधी रामचंद्र कानगुडे, चेअरमन रामचंद्र रायकर, ग्रामपंचायत सदस्य पोपट बोराडे, प्रकाश कानगुडे, संजय चौधरी, तसेच चेअरमन संजय कानगुडे, बापू गुंड, बंडु काका शेळके यांनी विशेष प्रयत्न केले. शेरेवस्ती, देवळाली ग्रामस्थांमधून कार्यकुशल आमदार .संजयमामा शिंदे, कर्तव्यदक्ष मा. सरपंच श्री आशिष आण्णा गायकवाड व त्यांच्या ग्रामपंचायत टीमचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# दिवाळी आठवड्यावर तरी धामोरी व्यवसायिकांवर ग्राहकमंदीचे सावट



**कोपरगांव । प्रतिनिधी**

तालुक्यातील धामोरी हे गाव तालुक्यात दोन नंबरच्या स्थानावर असुन गावागावातील लोकसंख्याही भरपूर प्रमाणात आहे.सर्व सोयीसुविधेचे व्यवसाय देखील आहेत.परंतु दिवाळी सण आठ दहा दिवसांवर येवून ठेपला असताना देखील धामोरी गावातील व्यावसायिकांवर ग्राहकमंदीचे सावट स्पष्ट दिसून येते आहे.सध्या गावातील किराणा दुकान,जनरल स्टोअर, हार्डवेअर, इलेट्रिकल्स,स्विट फरसाण,सलुन मोबाईल आदि दुकानदार या व्यवसायांच्या दुकानांवर सध्या ग्राहकांची मंदी दिसुन येत असल्याने आमचे धामोरी प्रतिनिधी दत्तात्रय घुले यांनी व्यावसायिकांकडून ग्राहक मंदीच्या बाबतीत अधिक जाणून घेतले असता सदरील व्यावसायिकांकडून सांगण्यात आले की,सध्याची वाढलेली महागाई त्यावर मजुरांच्या हाताला काम नाही आणि सध्या अवकाळी पावसाच्या अतिवृष्टीमुळे शेतकरी हवालदील झाला असल्याने बाजारपेठ ग्राहकमंदीचे सावट असल्याचे निदर्शनास आले.
अशा या परिस्थितीमुळे व्यावसायिकांवर ग्राहकमंदी असल्याने सदरील छायाचित्रातुन स्पष्ट दिसुन येत आहे.

# संगमनेर तालुक्यातील संस्कृती, दडपशाही,गुंडगिरी मध्ये अडकली

## विकास हा ठराविक कुटुंब, ठेकेदार पोसण्यासाठी आहे का-डॉ.सुजय विखे पाटील

**संगमनेर । प्रतिनिधी**

संगमनेर तालुक्याची संस्कृती ही फक्त दडपशाही आणि गुंडगिरीमध्ये अडकलेली आहे. येथील विकास हा फक्त ठराविक कुटूंबासाठी आणि ठेकेदार पोसण्यासाठी सुरु आहे. युवा संवाद यात्रा काढता पण तुमच्या सोबत युवा राहीला आहे का? असा थेट सवाल डॉ.सुजय विखे पाटील यांनी उपस्थित केला.
हिवरगाव पावसा येथे आयोजित केलेल्या युवा संकल्प मेळाव्यात बोलताना डॉ.सुजय विखे पाटील यांनी पुन्हा एकदा आ.बाळासाहेब थोरात यांच्या कार्यपध्दतीवर निशाणा साधला. या तालुक्यात सभा घेतांना रोज नवीन काहीतरी बोलावे लागते. मात्र येथील जनता ४० वर्षे एकच भाषण कसे ऐकते अशी उपरोधीक टिका करुन, तालुका कुटूंब असल्याची खोटी सहानुभूती मिळविण्याचे प्रयत्न वर्षानुवर्षे सुरु असल्याचा थेट आरोप त्यांनी केला.
तालुक्यातील आमदारांनी जी गावे दत्तक घेतली त्या गावांना एक रुपयांचा निधी त्यांनी कधी दिला






नाही. याच गावाने मात्र विखे पाटील यांना मानणारे सरपंच निवडून येतात याकडे लक्ष वेधून आता त्यांच्याकडे दत्तक जावू नका कारण त्यांच्या कुटूंबात जागा नाही, त्यांच्या कुटूंबात फक्त ठेकेदारांना संधी आहे. आता विखे पाटील परिवार तुमच्यासाठी समर्थ आहे. आमच्या गाडीत ठेकेदारांना नव्हे तर कार्यकर्त्यांना संधी आहे. अंगणवाडीच्या कामात सुध्दा पैसे खाणारे ठेकेदार यांनी निर्माण केले, हीच का तुमची संस्कती याचे उत्तर आता जनता मागत आहे. या तालुक्यात फक्त संस्कृतीवर भाषणं सुरु होतात मात्र आमची संस्कृती जमीनी हडपण्याची नाही. माजी महसूल मंत्र्यांनी गायरान जमीनी स्वतच्या संस्थांच्या नावावर करुन घेतल्या. मात्र महसूल मंत्री ना.विखे पाटील यांनी साडे तीनशे कोटी रुपयांच्या जमीनी या अनेक गावांच्या विकासासाठी आणि औद्योगिक वसाहत उभारण्यासाठी दिल्या. याकडे लक्ष वेधून एकदा संस्कृतीवर चर्चा कराच, तुमची संस्कृती फक्त ठेकेदार जीवंत ठेवण्यासाठी असल्याची टिका डॉ.सुजय विखे पाटील यांनी केली.निळवंडे होवू देत नाही असे अनेक आरोप विखे पाटील परिवारावर झाले. स्व.बाळासाहेब विखे पाटील यांना बदनाम केले गेले. परंतु भगवान के घर देर है अंधेरा नही. निळवंड्यांचे पाणी मंत्री ना.विखे पाटील यांनीच आणून दाखविले. यासाठी जेष्ठ नेते पिचड साहेब यांचेही मोठे सहकार्य मिळाले, त्यांचे योगदान कोणीही नाकारु शकत नाही. कधीतरी खर बोलायला शिका, केवळ प्लेक्स लावून स्वत:चा उदोउदो करुन घेणारी ही माणसं शेतक-याला पाणी देवू शकत नाही. आमच्या तालुक्यात या आम्ही स्वत:च्या खिशातून पैसे घालून शेतक-यांच्या बांधापर्यंत पाणी पोहोचविले. तालुक्यात परिवर्तन करण्याची हीच संधी आहे. महायुती सरकारने अनेक योजना दिल्या आहेत, त्याचा लाभ सर्वांनाच मिळाला आहे. महायुतीच्या योजनांमध्ये गरीब,श्रीमंत असा भेद नाही. अंमलबजावणीमध्ये पक्षीय राजकारण नाही. राजहंस दुध संघाला सुध्दा दूध अनुदानापोटी १४ कोटी रुपये दिले याकडे लक्ष वेधून येणा-या काळात यांच्या दडपशाहीची संस्कृती उखडून टाकण्याचे काम तुम्हाला करायचे आहे. निर्धार करा या तालुक्याचा यंदाचा आमदार हा महायुतीचाच करायचा आहे. मुख्यमंत्री पदाची स्वप्न पाहणारे आता आमदारही होवू शकणार नाही याचा पुर्नउच्चारही डॉ.सुजय विखे पाटील यांनी पुन्हा केला. याप्रसंगी रामभाऊ राहाणे, काशिनाथ पावसे, संदिप देशमुख, आरपीआयचे आशिष शेळके यांचीही भाषणं झाली. आ.थोरात समर्थ कार्यकर्त्यांनी प्रवेश केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077